## आदेश नि.२४ वर

**(दि.०२ जुलै, २०२६ रोजी पारीत)**

प्रस्तूतचा अर्ज अभियोग पक्षातर्फे साक्षीदार सत्यम बाळासाहेब लांडे यास तपासण्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ३११ अन्वये सादर केलेला आहे. अभियोग पक्षातर्फे असे कथन करण्यात आले आहे की, सदर साक्षीदार हा घटनेतील जखमी साक्षीदार असल्याने महत्वाचा साक्षीदार आहे. आरोपींतर्फे म्हणणे सादर करून सदर अर्जास तिव्र हरकत घेतली आहे. आरोपीने असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा अर्ज विचाराअंती व उणिव भरून काढण्यासाठी दाखल केला असुन सदर अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. तसेच साक्षीदार सत्यम बाळासाहेब लांडे याचा तपासादरम्यान तपास अधिकारी यांनी जबाब नोंदविलेला नसल्यामुळे सदर साक्षीदारास तपासता येणार नाही.

२. उभयतांचा युक्तीवाद ऐकला. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये दिलेल्या संबधीत तरतुदींचा संदर्भ घेतला.

३. आरोपींविरूध्द भारतीय दंड संहिता, कलम **२७९, ३३७, ३३८ व ४२७** अन्वये गुन्हा केल्याचा दोषारोप आहे. आरोपीने गुन्हा कबुल केलेला नसल्याने संपरिक्षा सुरू करण्यात आली. अभियोग पक्षाने एकुण **०४ साक्षीदारांची साक्षी** नोंदविलेली आहे. त्यानंतर अभियोग पक्षातर्फे प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आला आहे.

४. अभियोग पक्षातर्फे असे नमुद करण्यात आले आहे की, नमुद साक्षीदार हा घटनेतील जखमी साक्षीदार आहे. त्यामुळे प्रकरणाचा योग्य निर्णय होण्यासाठी नमुद साक्षीदाराची साक्ष नोंदविणे आवष्यक आहे.

५. युक्तिवादा दरम्यान सरकारी वकीलांनी फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ३११ अन्वये दिलेल्या तरतुदीचा आधार घेतला. सदर तरतुदी अन्वये साक्षीदारास परत बोलावण्याचा न्यायालयास अधिकार असल्याचे सांगतात. त्यामुळे याठिकाणी सदर तरतुदीचे अवलोकन करणे योग्य होईल. सदर तरतुद खालीलप्रमाणे —

***कलम ३११** — कोणतीही चौकशी, संपरिक्षा किंवा अन्य कार्यवाही कोणत्याही टप्यात असताना न्यायालय कोणत्याही व्यक्तीला साक्षीदार म्हणून समन्स काढु शकेल अथवा समक्ष हजर असलेल्या कोणत्याही व्यक्तीला साक्षीदार म्हणुन समन्स काढलेले नसेल तरी तिची साक्ष तपासणी करू शकेल अथवा आधी साक्षीतपासणी केलेल्या व्यक्तीला परत बोलावुन तिची फेरतपासणी करू शकेल आणि अशा कोणत्याही व्यक्तीचा साक्षीपुरावा खटल्याचा निर्णय न्याय्यपणे होण्यासाठी अत्यावश्यक आहे असे दिसुन आले तर न्यायालय तिला समन्स काढुन तिचा साक्ष तपासणी करील किंवा तिची फेरतपासणी करील.*

**६.** वरील तरतुदीचे काळजीपूर्वक वाचन केले असता असे निर्दशानास येते की, खटल्याचा निर्णय न्याय्यपणे होण्यासाठी कोणत्याही व्यक्तीचा साक्षीपुरावा अत्यावश्यक असल्यास त्या व्यक्तीला न्यायालय साक्षीदार म्हणुन तपासु शकते. वरील तरतुदीन्वये खटल्याचा निर्णय न्याय्यपणे होण्यासाठीच सदर साक्षीदाराची साक्ष महत्वाची असणे अत्यावश्यक आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन समोर येणारी मोटारसायकल क्र. एम. एच. १४ सी. वाय. ६५३२ या मोटारसायकलीस समोरून धडक दिली. त्यामुळे सदर मोटारसायकलवरील बाळासाहेब चंद्रकांत लांडे व सत्यम बाळासाहेब लांडे तसेच अनिरूद्ध थोरात यांना दुखापती झाल्या. यावरून असे दिसुन येते की, साक्षीदार सत्यम बाळासाहेब लांडे घटनेतील जखमी साक्षीदार आहे. अशा पस्स्थिीत प्रकरणाचा योग्य न्याय निर्णयासाठी अभियोग पक्षास सदर साक्षीदार सत्यम बाळासाहेब लांडे यास तपासण्याची संधी देणे आवश्यक आहे. तसेच त्यावर प्रकरणाचा योग्य न्यायनिर्णय होईल व त्याद्वावरे सत्यता समोर येण्यास मदत होईल. तसेच अभियोग पक्षास सदर साक्षीदार तपासण्याची संधी दिल्यास आरोपींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

अर्ज निशाणी **२४** मंजूर करण्यांत येत आहे व अभियोग पक्षास मागणी केल्याप्रमाणे साक्षीदार सत्यम बाळासाहेब लांडे यास तपासण्याची

परवानगी देण्यात येत आहे. त्याप्रमाणे सदर साक्षीदार सत्यम बाळासाहेब लांडे यास समन्स काढण्यात यावे.

SANTOSH LAXMAN VAIDYA

Digitally signed by SANTOSH LAXMAN VAIDYA
Date: 2026.07.02 13:45:13 +0530

**घोडेगाव**
**दिनांक. ०२/०७/२०२६**

(एस. एल. वैद्य)
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी**
**घोडेगाव, जि. पुणे**